SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

गुरुवार, दिनांक १६ जानेवारी, २०२०

अधिसूचना

क्र. ०७/२०२० दिनांक : १६/०१/२०२०

विषय :- हिवाळी २०१९ परीक्षेपासून परीक्षा केंद्रांना देखभाल खर्च देण्याबाबत.

संदर्भ :- अधिसूचना क्रमांक १६१/२०१७, दिनांक २८/१२/२०१७

सर्व संबंधितांच्या माहितीकरीता सूचित करण्यात येते की, दिनांक २० जूलै, २०१९ रोजी संपन्न झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या सभेत बाब क्रमांक ३० अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार **अभियांत्रिकी, भेषजी व विधी या ०३ (तीन) विद्याशाखेतील अभ्यासक्रमाकरीता** ऑनलाईन पध्दतीने प्रश्नपत्रिका वितरण करण्याकरीता थेट गोपनीय छपाईदारांकडून संबंधित परीक्षा केंद्रांना प्रश्नपत्रिकेचे वितरण या प्रक्रीयेत लागणा-या लेखनसामुग्री, विद्युत खर्च, प्रिंटर, कार्ट्रेज इत्यादी देखभाल खर्च म्हणून प्रती परीक्षार्थी रुपये २०/- फक्त (अक्षरी रुपये वीस फक्त) देय राहील, अशी परीक्षा व मूल्यमापन मंडळाने मान्यता प्रदान केली आहे. तसेच संदर्भिय अधिसूचनेनुसार वित्तीय संबंधित बाबीस व्यवस्थापन परिषेदेने यापुर्वीच मान्यता दिलेली असल्यामुळे पुन्हा कोणत्याही प्राधिकरणासमोर सादर करण्याची आवश्यकता नाही, असे दिनांक २० जूलै, २०१९ रोजी संपन्न झालेल्या सभेच्या कार्यवृत्तामध्ये नमूद केले आहे. या देखभाल खर्चाची पुर्तता परीक्षा केंद्राला परीक्षा संचालनासाठी विद्यापीठाकडून दिल्या जाणा-या अग्रीमातुन करण्यात यावी. सदर बाबीची अंमलबजावणी हिवाळी - २०१९ परीक्षेपासून लागु राहील.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ